ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध प्रकल्पांसाठी Cloud service सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी M/s ESDS Software Solutions Ltd या कंपनीस रु.९६,७०,४९१/-इतकी रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्हर्न २०२४ /प्र.क्र. ०१ /संगणक
चौथा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. आशिक/२०२५/ईएसडीएस क्लाऊड/ईगव्हर्नन्स/१४३/ दि.०७.०७.२०२६.

प्रस्तावना :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध प्रकल्पांसाठी Cloud service उपलब्ध करुन घेण्यासाठी GeM portal द्वारे निविदा प्रक्रीया राबवून M/s ESDS Software solutions Ltd. या कंपनीची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार, आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी दि. २३ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रान्वये सदर कंपनीस Cloud service उपलब्ध करुन देणेबाबत कार्यादेश देण्यात आले आहे. त्यानुसार, M/s ESDS Software Solutions Ltd. या कंपनीने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पांसाठी दि.१५.०१.२०२३ पासून आवश्यकतेनुसार Cloud service पुरविलेली आहे. त्यानुषंगाने, M/s ESDS Software Solutions Ltd. या कंपनीकडून जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२६ या कालावधीतील उपलब्ध करून दिलेल्या Cloud service करीताचे रु.९६,७०,४९१/-इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

M/s ESDS Software Solutions Ltd. या कंपनीकडून जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२६ या कालावधीतील उपलब्ध करून दिलेल्या Cloud service करीता आवश्यक रक्कम रु.९६,७०,४९१ /- इतक्या रक्कमेस याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. याबाबत निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च (०२) संकिर्ण (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०२६-२७ च्या उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३.	हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका २०१५ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग- २ मधील अनुक्रमांक २७ अ मधील नियम क्र. ७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०६१५२८५२६१४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARJUN ASHOK GIRAHAM

Digitally signed by ARJUN ASHOK GIRAHAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=C1300422597C5149006FE3B151E37C83067DCDA2A58855 3017547485013232 3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=41524CD000BBC1D5D1FF212378815B6BE4870FD0F CD2031260BAA18314B15437, cn=ARJUN ASHOK GIRAHAM
Date: 2026.08.06 15:29:46 +05'30'

(अर्जुन गिऱ्हाम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

७) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई.

८) निवडनस्ती/संगणक.